C. N. R. No. : MHKO130009142016

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ०३/२०१७ निशाणी क्र. ३८ खालील आदेश

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ क्रम ६ नियम १७ व प्रमाणे अर्जामध्ये दुरुस्ती करण्यासाठी केलेला आहे.

०२. अर्जदार यांचे असे कथन आहे की, सदरचा अर्ज मुळ रे.क.नं. ७७/२०११ चा हक्कज्ञापन व सरस मानाने वाटणी होऊन दावा मिळकती स्वतंत्ररित्या कब्जेत मिळणेसाठी दाखल केला होता. सदरचा दावा वादी गैरहजर म्हणुन दिनांक २३/१२/२०१६ रोजी ' डिसमिस फॉर डिफॉल्ट ' केलेला आहे. सदरचा दावा फेरफैलावर घेणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जात निशाणी १ वरील पान नं. ४ कलम नं. ३ चे शेवटी तसेच पान नं. ५ कलम ४-इ मधील ओळ नं. ६ व पान नं. ५ वरील कलम ५ मधील पहिली ओळ, अशी अनावधानाने तारीख २३/१२/२०१६ ऐवजी २२/१२/२०१६ लिहीली गेलेली आहे. सदरची चुक तांत्रीक पद्धतीची नजरचुकीने झालेली आहे. सदरची झालेली तारखेबाबतची चुक न्यायाचे दृष्टीने दुरुस्ती होणे अत्यंत आवश्यक व जरुरीचे आहे. सदरची दुरुस्ती दिनांक २२/१२/२०१६ ऐवजी २३/१२/२०१६ अशी लिहीने आवश्यक व जरुरीची आहे. सदरची दुरुस्ती झालेस न्यायदानास मदत होणार आहे. सदरची दुरुस्ती झालेस अर्जाचे स्वरुप बदलणार नाही. तसेच वि.प. यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट तसे न झालेस अर्जदार यांचे नुकसान होणार आहे. सबब, सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

०३. प्रस्तुत अर्जास वि.प. यांनी निशाणी ३९ वर म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज खर्चासहित नामंजुर करण्याची विनंती केली आहे. वि.प. यांचे असे कथन आहे की, अर्जदार हे अज्ञान नसुन ते आता सज्ञान झाले आहेत. वि.प.चे माहिती नुसार त्यांची लग्न

झालेली आहेत. त्यामुळे अर्जदाराने अज्ञान पा.क. म्हणुन दाखल केलेला अर्ज चुकीचा आहे. सबब, अर्ज चालणेस पात्र नाही. अर्जदाराने जाणुन बुजून हेतुपुरस्पर चुकीचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामध्ये सत्याचा अंश नाही. किंबहुना अर्जातील कथन ही विपर्यास आहेत. अर्जास कोणतेही योग्य व संयुक्तीक कारण नाही. अर्जात सुचविलेली दुरुस्ती काल्पनीक आहे. अर्ज दाखल करणेचा मुळ उद्देश वि.प. यांना त्रास देणेचा आहे. सबब, सदरचा अर्ज खर्चासह नामंजकुर करण्याची विनंती वि.प. यांनी केली आहे.

०४. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने खालील मुद्दे माझ्या समोर उपस्थीत होतात त्या मुद्दयावरील निष्कर्ष मी कारणासहींत खाली नोंदवत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदाराने अर्जामध्ये मागीतलेली दुरुस्ती ही अर्जामधील वादाचे निरसन करण्यासाठी योग्य आहे का ? | होय. |
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

<u>का र ण मि मां सा</u>

<u>मुददे क्र. १ व २ करीता</u>

०५. मुद्दे क्र. १ व २ यांची चर्चा व निष्कर्ष एकत्रीरीत्या मांडण्यात येत आहे.

०६. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज व त्यातील म्हणणे यांचे आवलोकन केले. दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये वाद कथनांतील सुधारणा यासाठी तरतुद केली आहे. त्यामध्ये न्यायालयास कारवाईच्या कोणत्याही टप्प्यावर न्याय असेल अशा रितीने व अशा अटीवर फेरबदल किंवा सुधारणा करण्याची मुभा वादग्रस्त असलेला खरा खुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी दिली आहे.

०७. प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी दावा ७७/२०११ हा पुन्हा फैलावर घेण्यसाठी दाखल केलेला आहे. अर्जाचे आवलोकन केले असता दिवाणी दावा ७७/२०११ हा हक्कज्ञापन, कायममनाई व सरस निरस मानाने वाटणीसाठी वादीने प्रतिवादी विरुध्द दाखल केला होता. सदरचा दावा वादी गैरहजर राहिल्यामुळे ' डिसमिस फॉर डिफॉल्ट '

काढुन टाकण्यात आला. प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदाराने निशाणी ३ अ.क्र. १ वर दिवाणी दावा क्र. ७७/२०११ मधील निशाणी १ व तसेच निशाणी १ खालील आदेशाची सही शिक्कयाची नक्कल दाखल केली आहे. सदर आदेश पाहिले असता दिनांक २३/१२/२०१६ रोजी दिवाणी दावा क्र. ७७/२०११ हा वादी गैरहजर असल्यामुळे ' डिसमिस फॉर डिफॉल्ट ' करण्यात आले आहे. परंतु, अर्जामध्ये अर्जदाराने दिनांक २२/१२/२०१६ अशी तारीख नमुद केली आहे. सदर तारीख ही अर्जदाराने अनावधानाने नमुद केल्याचे या अर्जात म्हटले आहे. सदर अर्ज हा अर्जदाराने शपथेवर दिला असून तो मान्य करण्यास कोणतीही अडचण नाही. त्यामुळे सदर दुरुस्ती प्रस्तुत अर्ज चालवणेकरीता आवश्यक असून त्यामुळे अर्जात कोणतेही बदल होणार नाहीत. तसेच, सदर दुरुस्तीमुळे वि.प. यांना कोणतेही नुकसान होत असल्याचे दिसून येत नाही. मुळातच अर्ज दिवाणी दावा क्र. ७७/२०११ हा पुन्हा फैलावर घेण्यासाठी असल्यामुळे अर्जदाराने मागीतलेली दुरुस्ती ही दिवाणी दावा क्र. ७७/२०११ ज्या तारखेस काढण्यास आला त्या तारखेसंदर्भात असल्यामुळे सदर दुरुस्ती ही प्रस्तुत अर्जामध्ये असलेले वादाचे निरसन करीता आवश्यक आहे. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवत असून मुद्दा क्र. २ च्या उत्तरात मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे -

आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार यांनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे योग्य ती दुरुस्ती मुळ अर्जात १४ दिवसाच्या आत करुन घ्यावी.

३. अर्जदार यांनी मुळ अर्जाची दुरुस्ती प्रत १४ दिवसाच्या आत दयावी.

Vijaya Narayanrao Katkar

Digitally signed by Vijaya Narayanrao Katkar
Date: 2020.02.25 17:57:51 +0530

ठिकाण - कागल
दिनांक – २४/०२/२०२०

(काटकर विजया एन. एस.)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
कागल

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | S. V. Kamble |
| Name of Court | :- | Katkar Vijaya N. S. C.J.J.D. and J.M.F.C. Kagal. |
| Date of Dictation/typed | :- | 24/02/2020 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 24/02/2020 |
| Judgment/order uploaded on | :- | 25/02/2020 |